नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५/२०१९
रामप्रसाद राऊत वि. बालासाहेब

## निशाणी क्रमांक ४० वर आदेश पारित
## (दिनांक ०७ फेब्रुवारी २०२३)

१. प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ०६ नियम १७ अंतर्गत दाव्यात दुरुस्ती करीता सादर केला आहे.

२. अर्ज व त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

३. दोन्ही पक्षाचे म्हणणे लक्षात घेता पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे काय ? | **होकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

## <u>कारणमिमांसा</u>
## <u>मुद्दा क्रमांक १ व २ करीता</u>

४. वादीने प्रस्तुत दावा कायमचा मनाई हुकुम मिळण्या करीता दाखल केला आहे. प्रस्तावित दुरुस्ती नुसार वादीचे असे म्हणणे आहे की, दावा दाखल केल्या नंतर प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीच्या पश्चिमेकडुन गैरकायदेशीररित्या गजानन मंगल कार्यालयाचे बांधकाम केलेले आहे. त्यामुळे सदर गैरकायदेशीर बांधकाम पाडुन मोकळा ताबा मिळण्यासंबंधी दादा दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. तसेच ज्या जागेवर प्रतिवादीने मंगल कार्यालय बांधलेले आहे, ती जागा प्रतिवादीने प्रशांत अंभुरे व केदार शर्मा यांच्याकडुन गैरकायदेशीररित्या विकत घेतली आहे. त्यामुळे सदर दावा दाखल केल्या नंतर झालेल्या घडामोडी दाव्यात समाविष्ट करुन त्या संबंधी दाद मागणे गरजेचे आहे. करीता प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजुर करण्याची मागणी वादीने केली आहे.

५.		याउलट निशाणी क्रमांक ४२ नुसार प्रतिवादीने सविस्तर खुलासा सादर करुन कथन केले आहे की, वादीने ज्याप्रमाणे कथन केले, त्याप्रमाणे वादीची कोणतीही जागा जायमोक्यावर शिल्लक नाही. त्यामुळे प्रतिवादीने त्याठिकाणी वादीच्या जमीनीवर बांधकाम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. म्हणुन वादीचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

६.		वादीचे कथन लक्षात घेता प्रस्तावित दुरुस्ती ही दावा दाखल केल्या नंतर झालेल्या घडामोडी संबंधीची आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे आहे की, त्या ठिकाणी वादीची जमीन शिल्लक नाही. या दोन्ही बाबींचा विचार केला असता त्या ठिकाणी वादीची जमीन शिल्लक आहे किंवा नाही आणि त्यावर वादीच्या कथना प्रमाणे प्रतिवादीने गजानन मंगल कार्यालय नावाचे मंगल कार्यालय गैरकायदेशीररित्या बांधले काय, ही बाब गुणवत्तेवर निकाली काढणे गरजेचे आहे. कथीत घडामोड ही दावा दाखल केल्यानंतर दाव्यात समाविष्ट असलेल्या मालमत्तेसंबंधी आहे. त्यामुळे सदर घडामोडी संबंधी वादीला नवीन दावा दाखल करावयास न लावता अनुषंगीक घडामोडीच्या आधारे वादीला प्रस्तुत दाव्यात दाद मागता येते. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे स्वरुपात फरक पडत नसुन सदर दिसणारा फरक हा अनुषंगीक घडामोडीमुळे दिसुन येते. त्यामुळे प्रतिवादीच्या हक्कांवर कोणतीही बाधा येणार नाही. याउलट एकाच मालमत्तेसंबंधी विभिन्न प्रकरणे उपस्थित करण्यापेक्षा अनुषंगीक घडामोड प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करुन गुणवत्तेवर निकाली काढणे सोईचे होईल. त्यामुळे वादीने प्रस्तावित केलेली दुरुस्ती ही प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता उपयुक्त असल्याचे दिसुन येते. म्हणुन वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक २ च्या उत्तराकरीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१.	वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी क्र. ४०) मंजुर करण्यात येतो.

२.	वादीने पुढील तारखेला किंवा त्यापुर्वी प्रस्तावित दुरुस्ती दाव्यात समाविष्ट करावी व लगेच दुरुस्ती दाव्याच्या प्रती दाखल कराव्यात.

**स्वाक्षरीत/-**

ठिकाण - परतुर		(लिलाधर दा. कोरडे)

दिनांक - ०७/०२/२०२३		दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), परतुर

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this PDF file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | V.N.Thakur |
| Court Name | :- | Liladhar D. Korde, C.J.(Jr.Div.), Partur |
| Date of decision | :- | 07-02-2023 |
| Order signed by P.O. on | :- | 07-02-2023 |
| Order uploaded on | :- | 08-02-2023 |